Journal of Research & Development
Vol. 4 (Issue. 06), September, 2014
(ISSN-2230-9578)

महाराष्ट्राची औद्योगिक स्थिती : एक अभ्यास

¯ÖÖ.›Ö.‡.•ÖÖ.ÃÖÖ%ÖÖ
शिवाजी महाविद्यालय,उदगीर

प्रस्तावना :-

1 ´Ö 1960 ¸Ö•ÖÖ द्विभाषिक राज्यातून मुंबईसह महाराष्ट्राची निर्मिती –ाली. पश्चिम महाराष्ट्र, कोकण, मुंबई, मराठवाडा, विदर्भ, खानदेशासह विविधतेने व नैसर्गिक साधनसंपत्तीने स्वयंपूर्ण असलेल्या मÆÖ¸ÖÂ™Ö»ÖÖ ³ÖÖ¸ÖŸÖÖ"ÖÖ आर्थिक राजधानी मुंबई मिळाली. म्हणजे देशाची आर्थिक नाडी महाराष्ट्राच्या हाती आली. अशातच 720 कि.मÖ. "ÖÖ सुसंपन्न असा समुद्रकिनारा लाभला. मुत्सद्दी राजकारणी, उद्योगपती, कुशल कामगार या त्रिसूत्रीने सहकाराच्या माध्यमातून अल्पावधीतच नेत्रदिपक प्रगती केली आणि भारतातले एक अत्यंत प्रगतीशील राज्य म्हणून नावÖÖ¹y¯ÖÖ»ÖÖ आले. भारताच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नात (GDP) महाराष्ट्राचा वाटा अधिक आहे. म्हणजेच भारताच्या राष्ट्रीय व दरडोई उत्पन्नापेक्षा महाराष्ट्राचे सकल उत्पन्न व दरडोई उत्पन्न बरेचसे जास्त आहे. शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, राजकीय, औद्योगिक क्षेत्रात इतर राज्याच्या तुलनेत महाराष्ट्र बरेच पुढे आहे. म्हणून महाराष्ट्राकडे एक प्रगतीशील पुरोगामी राज्य म्हणून पाहिले जाते.

पण अलिकडच्या काळात गुजरात, गोवा, हरियाणा, केरळ, पंजाब आदी राज्य आर्थिक, औद्योगिक, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात बरेच पुढे गेले आहेत. त्यांचा आर्थिक विकासाचा वेग महाराष्ट्राच्या विकासाच्या वेगापेक्षा कितीतरी अधिक आहे. अलिकडे महाराष्ट्रातील अनेक उद्योगधंदे गुजरात, कर्नाटक, आंध्रप्रदेश, पश्चिम बंगाल आदी राज्यातÖ ÃÆÖ»ÖÖŸÖ¸ÖŸÖ –ालेले व होत असलेले दिसत आहेत. त्यातच महाराष्ट्राच्या सहकाराने स्वहाकार केल्यामुळे साखर कारखानदारी मोडकळीस आली आहे. सहकार तत्वावरचे अनेक उद्योगधंदे तोट्यात तर बरेच बंद ¯Ö›»Ö †ÖÆŸÖ. त्यामध्ये महाराष्ट्रातील अमूल्य अशी साधनसंपत्ती व भांडवल विनावापर कुजत पडले आहे. एकेकाळी इतर राज्यातील क¿Ö»Ö-अकुशल कामगारांना रोजगार पुरविणारे अग्रगण्य राज्य आज आपल्या राज्यातील तरुणांना काम देण्यास असमर्थ ठरले आहे. विजेअभावी अनेक उद्योगधंदे बंद पडत आहेत. एकेकाळी विजेची निर्यात करणारे राज्य आज लोडशेडींगच्या चपाट्यात अडकलेले दिसून येते. त्यामुळे अनेक देशी व परदेशी उद्योगपती महाराष्ट्राला पसंती देण्याऐवजी इतर राज्याला पसंती देत आहेत. त्यातच FDI चे महाराष्ट्रातील गुंतवणुकीचे प्रमाण बरेच कमी –ÖÖ»Ö आहे. त्यामुळे कृषी, औद्योगिक व सेवा क्षेत्राचा विकासारचा वेग फारच मंदावलेला आहे. त्यातच असमतोल क्षेत्रीय विकास, दुष्काळ, अवर्षणे, मोठ-मोठे घोटाळे, भ्रष्टाचार, प्रांतवाद, सिमावाद, पायाभुत सुविधांचा अभाव अशा अनेक कारणांमुळे महाराष्ट्राची सर्वच क्षेत्रात पिछाडी –ÖÖ»Ö»ÖÖ †ÖÆ.

अशा या महाराष्ट्राला पुर्वीचे गतवैभव प्राप्त करण्यासाठी औद्योगिक, कृषी आणि सेवा क्षेत्रातील विकासाचा वेग वाढवून पायाभुत सोयी-सुविधांत सुधारणा व वाढ करणे, विजेसारख्या क्षेत्रात स्वयंपूर्णता निर्माण करणे, पुन्हा एकदा सर्वच क्षेत्रात नंबर एकचे राज्य म्हणून नावारुपाला येण्यासाठी महाराष्ट्राने कोणती कृती व पावले उचलणे आवश्यक आहे की ज्यामुळे महाराष्ट्राच्या विकासाचा वेग वाढेल यासाठी महाराष्ट्रातील औद्योगिक, शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक आदि बाबींचा आढावा घेणे आवश्यक आहे. कारण आर्थिक विकासाच्या गाडीचा वेग औद्योगिक व सेवा क्षेत्राच्ÖÖ विकासावर अवलंबून असतो. या अनुषंगाने महाराष्ट्रातील औद्योगिक क्षेत्राच्या सद्यस्थितीचा आढावा घेणे आवश्यक वाटते. कारण कोणतेही राज्य भविष्यात कशी वाटचाल करेल, हे त्या राज्याच्या आर्थिक व सामाजिक स्थितÖÖ%ÖÖ¸ अवलंबून असते. म्हणून हा विषय अभ्यासास निवडला आहे.

^×§À™¶ :

महाराष्ट्राच्या औद्योगिक स्थितीचा अभ्यास करण्यामागे संशोधकाचे पुढीलप्रमाणे उद्दिष्ट आहे त्या उद्दिष्टाच्या पूर्ततेसाठी संशोधकाने महाराष्ट्रातील औद्योगिक स्थिती : एक अभ्यास हा विषय निवडला आहे.

1) महाराष्ट्रातील उद्योगाच्या सद्यस्थितीचा आढावा घेणे.
2) महाराष्ट्रातील औद्योगिक विकासाच्या दराचा आढावा घेणे.
3) महाराष्ट्रातील उपलब्ध पायाभुत सुविधांचा आढावा घेण.
4) महाराष्ट्रातील उद्योग आजारी का पडतात त्यांच्या कारणांचा शोध घेणे.

5) बरेच उद्योग राज्याबाहेर स्थलांतरीत होत आहेत, स्थलांतराच्या कारणांचा शोध घेणे.

वरील प्रमुख उद्दिष्ट्ये डोळ्यासमोर ठेवून संशोधकाने महाराष्ट्राची औद्योगिक स्थिती : एक अभ्यास हा विषय निवडला आहे. त्यासाठी संशोधकाने पुढील गृहीतके म्हणून गृहीत धरली आहेत.

गृहीतके :

1) अलिकडे महाराष्ट्राचा औद्योगिक विकासाचा वेग मंदÛ¾Ö»ÖÖ †ÖÆ.
2) महाराष्ट्रात आजारी उद्योगाची संख्या बरीच वाढली आहे.
3) विजटंचाई (लोडशेडींग) ही प्रमुख समस्या आहे.
4) महाराष्ट्रातून उद्योगाचे स्थलांतर होत आहे.
5) भारतातील इतर राज्य औद्योगिकदृष्ट्या महाराष्ट्राच्या पुढे गेले आहेत.
6) FDI चे महाराष्ट्रातील गुंतवणुकीचे प्रमाण घटले आहे.

महाराष्ट्राची औद्योगिक क्षेत्रातील सद्यस्थिती 2012-2013 :

आजपर्यंत भारताच्या औद्योगिक विकासात महाराष्ट्रात भूमिका महत्वपूर्ण राहिली आहे. स्थानिक आणि परदेशी गुंतवणूकदारांनी राज्यात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करावी. यासाठी राज्य सतत प्रयत्नशी»Ö †ÖÆ. इंजिनिअरींग, इलेक्ट्रॉनिक्स, हार्डवेअर, ॲटोमोबाईल, केमिकल इंडस्ट्री, पेट्रोकेमिकल्स, फार्मास्युटिक्ल्स, इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी, नॅनोटेक्नॉलॉजी आणि बायोटेक्नॉलॉजी अशा विविध क्षेत्रामध्ये राज्यांनी चांगली प्रगती केली आहे. त्यामुळे बऱ्याच अंशी प्रशिक्षित आणि गुणवत्तापूर्ण कामगार, व्यावसायिक कौशल्य विकसित होवून उद्योगाला पोषक अशा वातावरणाची निर्मिती –ाली आहे. त्यामुळे औद्योगिक विकासाला चालना मिळाली आहे. पण औद्योगिक विकासाच्या दराचा वेग पूर्वीपेक्षा कमी –ÖÖ»Ö»ा दिसून येत आहे. टाटाच्या नॅनो कारसारखा मोठा प्रकल्प गुजरातला गेला आहे. दिवसातील 24 तासांपैकी सर्रासपणे 12 ते 14 तास लोडशेडींग केली जात आहे. त्याचा उद्योगाच्या विकासाच्या ¤¸ÖÖ¾Ö¸ ×¾Ö¯Ö¸ßŸÖ ¯Öरिणाम होवून औद्योगिक विकासाचा दर मंदावलेला दिसून येतो. तरी पण सन 2012-13 ´Ö-ÖßÖ»Ö महाराष्ट्राची स्थिती पुढीलप्रमाणे सांगता येते.

दृष्टिक्षेपात औद्योगिक स्थिती 2012-13 :

1) राज्याची बारावी पंचवार्षिक योजनेतील 2,75,000 हजार कोटी रुपयाच्या मंजूर प्रकल्पांपैकी 45 टक्के प्रकल्प सुरु आहेत. तर 10 टक्के प्रकल्प कार्यवाहीच्या प्रक्रियेत आहेत. याचे प्रमाण 51 टक्के होते.
2) सन 2012-13 या वर्षात 17,779 प्रकल्पांना ´Ö•Ö¸ß ×´ÖôÖ»ÖßÖ †ÖÆ.
3) या प्रकल्पात 9,50,972 कोटी रुपयांची गुंतवणूक –ÖÖ»ÖßÖ †ÖÆ.
4) या प्रकल्पामुळे सन 2012-13 मध्ये 4,439 रोजगाराची निर्मिती –ÖÖ»ÖßÖ †ÖÆ.
5) सन 2012-13 मध्ये महाराष्ट्रात कृषी क्षेत्राच्या वाढीचा दर 1.8 टक्के आहे.
6) सन 2012-13 मध्ये औद्योगिक क्षेत्राच्या वाढीचा दर 3.1 टक्के आहे.
7) सन 2012-13 मध्ये सेवा क्षेत्राच्या वाढीचा दर 6.6 टक्के आहे.
8) सकल देशांतर्गत उत्पादनाच्या (GDP) वाढीचा दर 5 टक्के आहे.

वरील औद्योगिक स्थितीवरुन असे लक्षात येते की, मंजूर प्रकल्पापैकी निर्धारित कालावधीत प्रकल्प पूर्ण होण्याचे प्रमाण 51 टक्के आहे. म्हणजे एका आर्थिक वर्षात मंजूर प्रकल्पांपैकी 49 टक्के प्रकल्प सुरुच होत नाहीत. प्रकल्Ö ´Ö•Ö¸ß“Ö प्रमाण बरेच असले तरी त्यात विदेशी गुंतवणूकीचे प्रमाण अल्प आहे आणि गुंतवणूकीच्या प्रमाणात रोजगार निर्मितीचे प्रमाण बरेच कमी आहे. कृषी, औद्योगिक व सेवा क्षेत्रातील विकासाचा दर विचार करायला लावणारा आहे. कारण एकेकाळी औद्योगिक व सेवाक्षेत्राच्या विकासात दोन आकडी दर गाठलेला महाराष्ट्र आज बराच मागे आलेला दिसून येत आहे. एकंदरीत तीनी क्षेत्राच्या अल्प विकास दरामुळे एकंदर महाराष्ट्राचा सकल विकासाचा दर मंदावला आहे. त्यामुळे उलट गुणक संकल्पनेप्रमाणे विकासाचा दर अधिकच कमी –ाला आहे. त्याचा विपरीत परिणाम महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेवर होवून इतर राज्याच्या तुलनेत महाराष्ट्र औद्योगिकदृष्ट्या मागे पडलेले दिसून येते.

महाराष्ट्रातील चालू कारखान्यांची संख्या व रोजगार निर्मिती तक्ता

अ.क्र.	¾ÖÁÖ	कारखान्यांची संख्या	रोजगार हजारात
1	1961	8233	788
2	1971	10241	998
3	1981	16594	1192

4	1991	24119	1169
5	2001	28324	1201
6	2005	30385	1258
7	2013	168481	32.11

स्त्रोत : महाराष्ट्राची आर्थिक पाहणी

वरील तक्त्यावरुन असे लक्षात येते की, 1961 ते 2013 पर्यंत महाराष्ट्रातील कारखान्यांची संख्या ¾ÕÕœ»Õ»ÕÕ †ÕÆ. त्याचप्रमाणे रोजगारात वाढ –ाली आहे. वाढ म्हणावी तेवढी उद्योगाच्या संख्येच्या प्रमाणात रोजगारात वाढ –ÕÕ»Õ»ÕÕ नाही.

महाराष्ट्रातील उद्योग क्षेत्राचे योगदान :

महाराष्ट्राच्या व भारताच्या आर्थिक विकासात महाराष्ट्रातील उद्योग क्षेत्राचे योगदान बरेच आहे. कारण महाराष्ट्रातील नैसर्गिक विविधतेमुळे खनिज व नैसर्गिक संपत्तीतील मुबलकतेमुळे, हवामान, भौगोलिक स्थान, विस्तार ¾Õ ´ÕÕ‡´ÕÕ अनेक उद्योगाचे केंद्रीकरण इतर राज्यापेक्षा महाराष्ट्रात अधिक प्रमाणात –ाले आहे. त्यामुळे महाराष्ट्राच्या व भारताच्या आर्थिक विकासात महाराष्ट्रातील उद्योगक्षेत्राचे योगदान भारताच्या आर्थिक विकासात महाराष™ÕŸÕÕ»Õ उद्योगक्षेत्राचे योगदान बहुमूल्य समजले जाते. थोडक्यात ती पुढील बाबीवरुन स्पष्ट होते.

- मुंबईला भारताची आर्थिक राजधानी म्हणून ओळखले जाते.
- आशिया खंडातील सर्वात जास्त आर्थिक उलाढाल होणारे शहर म्हणून मुंबईकडे पाहिले जाते.
- उद्योगाला अर्थपुरवठा करणारी जगातील न्यूकार्य नंतरची दुसरी शेअर्स बाजार मुंबईत आहे. त्यामुळे उद्योगाला अर्थपुरवठा होवून उद्योगाचा विकास –ÕÕ»ÕÕ †ÕÆ.
- उद्योगाच्या विकासामुळे पुरक व्यवसायाचा विकास होवून महाराष्ट्रात उद्योगाचे केंद्रीकरण –ÕÕ»Õ †ÕÆ.
- भारताच्या एकूण औद्योगिक क्षेत्रापैकी एकट्या महाराष्ट्राचा वाटा 22 टक्के आहे.
- राज्यात उद्योगाच्या वाढीचा वेग वार्षिक 15 ते 18 टक्के आहे.
- राज्याच्या औद्योगिक धोरणानुसार दरवर्षी औद्योगिक क्षेत्रात अंदाजे 5000 कोटी रुपयांची गुंतवणूक होणे अपेक्षित आहे.
- आजपर्यंत राज्यात 10000 कोटी रुपयाची थेट परकीय गुंतवणूक (FDI) –ÕÕ»ÕÕ †ÕÆ.
- हे प्रमाण भारतातील FDI च्या 22.9 टक्के आहे. तर प्रकल्पाची संख्या 4246 असून तिचे भारतीय स्तरावरील प्रमाण 20.6 टक्के आहे.
- महाराष्ट्रात 31 जानेवारी 2013 अखेर मोठ्या उद्योगांची संख्या 4915 असून त्यातून 11.25 लाख लोकांना रोजगार मिळाला आहे. तर मध्यम उद्योगाची संख्या 1,63,566 असून त्यातून 20.97 लाख लोकांना रोजगार मिळाला आहे.

थोडक्यात, वरीलप्रमाणे महाराष्ट्रातील उद्योग क्षेत्राचे योगदान असले तरी गेली काही वर्षे महाराष्ट्रातील उद्योग अपेक्षित वेगाने वाढत नसल्याने राज्यावरील कर्जाचे प्रमाण बरेच वाढले आहे. अशा स्थितीतून बाहेर येण्यासाठी राज्यांनी नवीन औद्योगिक धोरण राबवून त्यात बदल घडवून आणण्यासाठी पावले उचलली पाहिजेत. कारण भारत हा जगातील सर्वात तरुण व तरुणाचा देश म्हणून ओळखला जात आहे. त्यामुळे तरुणातील युवा शक्तीचा पर्याप्त वापर करुन घेण्यासाठी त्यांच्या हाताला काम देण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी राज्याने असे नवीन औद्योगिक धोरण असावे की त्यातून रोजगार निर्मितीवर अधिक भर असेल. जसे 5 लाख कोटीची गुंतवणूक आणताना किमाÕ 20 लाख रोजगार निर्माण होईल याकडे लक्ष द्यावे. कारण भारताच्या आर्थिक विकासाचा रस्ता महाराष्ट्रातून जातो व महाराष्ट्रातील औद्योगिक क्षेत्रातील विकासातून जातो. म्हणून महाराष्ट्रातील नियोजनकर्त्यांनी अत्यंत काळजीपूर्वक ´ÕÆाराष्ट्राचे औद्योगिक धोरण ठरवावे. की ज्यामुळे महाराष्ट्राचा व अर्थातच भारताच्या आर्थिक विकासाचा वेग वाढेल.

महाराष्ट्रातील उद्योगापुढील समस्या :

अलिकडील काळात महाराष्ट्रातील उद्योगाला आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक, राजकीय अशा अनेक क्षेत्रातील समस्यांनी ग्रासले आहे. त्यामुळे समस्येच्या चक्रव्यूहात महाराष्ट्रातील उद्योगक्षेत्र अडकले आहे. त्या समस्याचे स्वरूप खालीलप्रमाणे विशद केले आहे.

1) अपुऱ्या पायाभूत सुविधा
2) सरकारचे लकवा धोरण
3) प्रशिक्षित कुशल मनुष्यबळाचा तुटवडा
4) पुरेशा भांडवलाचा व भांडवलाच्या गुंतवणूकीचा अभाव
5) आजारी उद्योगाचे वाढते प्रमाण
6) राजकीय नेतृत्वाची उदासीनता
7) कामगारांचे राजकारण
8) राज्याचे एलबीटी धोरण की ज्यामुळे करात वाढ होते.
9) जगातील मंदीमुळे मंदावलेली बाजारपेठ
10) बँका बुडीत निघण्याचे वाढते प्रमाण
11) चुकीची शिक्षण पद्धती
12) दररोज वाढत जाणारे लोडशेडिंगचे प्रमाण
13) विशिष्ट ठिकाणी –ालेले उद्योगाचे केंद्रीकरण
14) ओस पडत चाललेल्या MIDC
15) ग्रामीण व जिल्हा नियोजनाकडील दुर्लक्षामुळे लघू व कुटीर उद्योगाचे घटते प्रमाण
16) ¼ÔÕœŸÕ "ÕÕ»Ô»Ô»ÔÕ ¸Ô•Ôकीय हस्तक्षेप
17) आरटीआय कायद्याचा वाढता उपद्रव
18) मोडकळीस आलेला सहकार
19) राज्य व देशपातळीवरील मोठमोठे आर्थिक घोटाळे
20) उद्योगक्षेत्राच्या विकासाविरोधी वातावरण

वरीलप्रमाणे अनेक समस्या महाराष्ट्रातील उद्योगापुढे सद्य ¯Ôx¸ÛÃ£ÕŸÕßŸÕ दिसून येतात.

×¿Ô±úÕ¸ÃÕß :

महाराष्ट्रातील औद्योगिक क्षेत्राच्या विकासाचा वेग वाढविण्यासाठी खालीलप्रमाणे शिफारशी सुचवलेल्या †ÔÆŸÕ.

1) ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी ªÕ¼ÕÕß.
2) लघु व कुटीर उद्योगांना प्रोत्साहन द्यावे.
3) प्रत्येक जिल्ह्यातील MIDC चे पुर्नज्जीवन करावे.
4) शेती आणि उद्योग यांचा समन्वय साधावा.
5) कृषी प्रक्रिया उद्योगांना चालना द्यावी.
6) 24 तास उच्च दाबाच्या विजेचा पुरवठा क¾¸Õ¼ÕÕ.
7) SEZ ला परवानगी द्यावी.
8) बायोटेकमधील प्रगतीला प्रोत्साहन द्यावे.
9) रिटेल क्षेत्रात FDI ला परवानगी द्यावी.
10) देशी व विदेशी गुंतवणूकीला पोषक अशा वातावरणाची निर्मिती करावी.
11) नवउद्योजकांना प्रोत्साहन द्यावे.
12) उद्योगांमधील महिलांचा सहभाग वाढवावा.
13) उद्योगांचे विकेंद्रीकरण करावे.
14) आजारी उद्योगांचे निर्णगुंतवणूकीकरण करावे.
15) उद्योगाला बूस्टर डोस द्यावा.

ÃÕÕ¸Ô¿Ô :

सन 2008 ची जागतिक मंदी, मोठमोठे आर्थिक घोटाळे आदी कारणांमुळे महाराष्ट्रातील उद्योग क्षेत्राचा विकास मंदावला असला तरीही इतर घटक राज्यापेक्षा तो जास्तच आहे. तरी पण उद्योग क्षेत्राच्या संपूर्ण विकासासाठी भविष्यकाळातील समस्यांचा अचुक अंदाज बांधून अनेक पायाभूत क्षेत्रात कुशल मनुष्यबळ निर्मितीसाठी आताच योग्य पावले उचलणे आवश्यक आहे. त्यासाठी समाजातील सर्वच क्षेत्रातून तशी प्रगती करणे आवश्यक आहे. म्हणून

´ÔÆराष्ट्रातील राजकारणी, नियोजनकारांनी, उद्योगपतींनी व एकंदर सर्व जनतेनी स्वतःत बदल करून पोषक वातावरण निर्माण केले तर भविष्यातही महाराष्ट्र हे एक प्रगत राज्य म्हणून ओळखले जाईल.

ÃÔ¤³Ô :

1) महाराष्ट्राची आर्थिक पाहणी
2) स्पर्धा परीक्षा मासिक
3) प्रतियोगिता दर्पण
4) भारतीय अर्थव्यवस्थेचे अतिरिक्त मासिक
5) भारतीय अर्थव्यवस्था-¤¢Ô, ÃÔ¤¡´Ô
6) महाराष्ट्राची अर्थव्यवस्था - डॉ.बी.डी.इंगळे
7) लोकराज्य
8) योजना मासिक